शौर्यपूर्ण व धाडसी कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना "मुख्यमंत्री शौर्य पदक" घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र.पीएमडी-०२२६/प्र.क्र.३३/पोल-१,

दुसरा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १६ ऑक्टोबर, २०२६.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्राला माओवाद, दहशतवाद, जातीय दंगली, संघटित गुन्हेगारी, तस्करी याअंतर्गत सुरक्षेचे प्रश्न व बाह्य हल्ल्यांपासून सुरक्षित ठेवण्याचे कार्य महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी/अंमलदार धाडसाने व शौर्याने पार पाडीत आहेत. सद्यस्थितीत पोलीस दलाच्या शौर्याला/धाडसाला योग्य तो सन्मान देण्याकरिता भारत सरकार, गृह मंत्रालय यांच्या शिफारशीने मा. राष्ट्रपतींमार्फत शौर्य पदके, राष्ट्रपती शौर्य पदके, अशोक चक्र, किर्तीचक्र व शौर्य चक्र अशी विविध पदके दरवर्षी २६ जानेवारी व १५ ऑगस्ट या दिवशी घोषित केली जातात.

२. केंद्र शासनाकडून गुणवत्तापूर्ण सेवेसाठी "राष्ट्रपती गुणवत्तापूर्ण सेवा पदक", "गुणवत्तापूर्ण सेवा पदक" आणि "केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक" ही पदके दिली जातात.

३. भारतातील काही राज्यात जसे की, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, तेलंगणा, मेघालय, मणिपूर व केरळ या राज्यातील पोलीसांद्वारे शौर्यपूर्ण कामगिरी बजावली असल्यास, मुख्यमंत्री शौर्य पदक घोषित केले जाते.

४. माओवाद्यांशी लढताना आतापर्यंत महाराष्ट्र राज्यातील २३६ जवान शहीद झाले असून, त्यापैकी गोंदिया मधील २२ व गडचिरोली मधील २१४ जवान शहीद झाले आहेत. तसेच मुंबईतील २६/११ हल्ल्यावेळी पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांशी लढताना १४ पोलीस अधिकारी / अंमलदार शहीद झाले आहेत. महाराष्ट्र राज्यात माओवाद, दहशतवाद, संघटीत गुन्हेगारी व इतर प्रसंगी, धाडसी कामगिरी करणाऱ्या अनेक पात्र पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या पदकांची संख्या कमी असल्याने, असे पदक व सन्मान मिळत नाही.

५. यास्तव, राज्यात माओवादविरोधी, दहशतवादविरोधी, संघटीत गुन्हेगारीविरोधी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच शौर्यपूर्ण व धाडशी कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मनोबल उंचविण्यासाठी तसेच त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेची शासनाकडून दखल घेऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी, "मुख्यमंत्री शौर्य पदक" देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र राज्यात माओवादविरोधी, दहशतवादविरोधी, संघटीत गुन्हेगारीविरोधी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच शौर्यपूर्ण व धाडशी कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मनोबल उंचाविण्यासाठी तसेच त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेची शासनाकडून दखल घेऊन त्यांच्या धाडसाला/शौर्याला गौरविण्यासाठी त्यांना "मुख्यमंत्री शौर्य पदक" देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१. **"मुख्यमंत्री शौर्य पदक", अटी व शर्ती :-**

(क) जे महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी/ अंमलदार त्याला नेमून दिलेले कर्तव्य बजावित असताना अत्यंत शौर्यपूर्ण /वीरतापूर्ण/दृढ साहस/धाडस दाखवतील.

(ख) कायदयाने स्थापित राज्याचे रक्षण करण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्थेची बिघडलेली परिस्थिती हाताळण्यासाठी धाडसी व शौर्यपूर्ण कामगिरी करतील.

(ग) धाडसी व शौर्यपूर्ण कामगिरीमध्ये माओवादी विरोधी अभियानामध्ये जीवाची जोखीम पत्करुन माओवादी मारले जाणे/अटक करणे, तसेच दहशतवाद विरोधी कारवाईमध्ये दहशतवादी अटक करणे/ मारले जाणे, संघटीत गुन्हेगारी विरोधात जिवाची जोखीम घेवून गुन्हेगार अटक करणे, जातीय दंगली व कायदा व सुव्यवस्था परिस्थितीमध्ये लोकांचे प्राण वाचविणे तसेच जीवाची जोखीम घेवुन समाज विघातक व्यक्तींना अटक करणे यांचा समावेश होतो.

(घ) सदर पदक महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना मरणोत्तरही घोषित करता येवू शकेल,

(ङ) सदर पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेविरुध्द कोणतीही प्राथमिक किंवा विभागीय चौकशी प्रलंबित नसावी, न्यायालयात कोणतेही खटले प्रलंबित नसावे तसेच त्यांना त्यांच्या सेवा काळात कोणतीही जबर शिक्षा झालेली नसावी.

(च) ज्या प्रकरणांमध्ये पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी शौर्यपूर्ण कामगिरी बजावली आहे अशी प्रकरणे राष्ट्रीय मानवी हक्क आयोग/ राज्य मानवी हक्क आयोग किंवा कोणतेही न्यायालय/ प्राधिकरणाकडे प्रलंबित नसावी.

(छ) ज्या शौर्यपूर्ण कामगिरीमध्ये माओवादी/अतिरेकी/संघटित गुन्हेगारी टोळीचे सदस्य व इतर कोणत्याही व्यक्तीचा चकमकीमध्ये मृत्यू झालेला आहे. अशा प्रकरणांमध्ये न्यायदंडाधिकारी चौकशी अहवाल प्राप्त असावा व स्वयंस्पष्ट असावा.

(ज) पोलीस शिपाई ते पोलीस महासंचालक पर्यंतच्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना महाराष्ट्र मुख्यमंत्री शौर्यपदक घोषित करता येईल.

२. **पदकांची संख्या:** घोषित करावयाचे पदकांची संख्या प्रत्यक्ष कामावर आधारित असेल व त्याकरिता किमान अथवा कमाल अशी पदक संख्या मर्यादा असणार नाही.

३. **"मुख्यमंत्री शौर्य पदक" धारकांना मिळणारे लाभ:-**

(क) पदक पात्र पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना एक रकमी रोख रुपये ५०,०००/- मिळतील.

(ख) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पदक व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येईल.

४. **निवडप्रक्रिया:-**

(क) महाराष्ट्र मुख्यमंत्री शौर्य पदकाचे प्रस्ताव जिल्हा स्तरावरुन पोलीस अधीक्षक हे परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उपमहानिरीक्षक यांचे मार्फतीने तसेच आयुक्तालय स्तरावरुन, पोलीस आयुक्त हे पोलीस महासंचालक कार्यालयात सादर करतील.

(ख) पोलीस महासंचालक कार्यालयातील छाननी समिती, प्रस्तावांची छाननी करेल. ज्यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील.

१.	पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	अध्यक्ष
२.	अपर पोलीस महासंचालक, (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
३.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे प्रतिनिधी	सदस्य
४.	अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
५.	अपर पोलीस महासंचालक (द.वि.प.), महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
६.	अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
७.	आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य

(ग) पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर, शासन स्तरावरील तपासणी समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील:-

१.	अपर मुख्य सचिव, गृह	अध्यक्ष
२.	पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य	सदस्य
३.	पोलीस आयुक्त, वृहन्मुंबई	सदस्य

(घ) त्यानंतर, प्रस्ताव मंजूरीसाठी मा. गृहमंत्री तथा मा. मुख्यमंत्री यांच्यासमोर सादर करण्यात येईल.

(ङ) **वेळापत्रक :-**

(क)	परिक्षेत्रीय विपोमनि/पोउपमनि/पोलीस आयुक्त यांचेकडून पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करण्याची मुदत	प्रत्येक वर्षाच्या दि.२८ फेब्रुवारी पर्यंत
(ख)	पोलीस महासंचालक कार्यालयाकडून गृह विभाग, महाराष्ट्र शासनास प्रस्ताव सादर करण्याची मुदत	प्रत्येक वर्षाच्या दि.३१ मार्च पर्यंत
(ग)	पुरस्काराची घोषणा	प्रत्येक वर्षाच्या दि.३० एप्रिलच्या सायंकाळी

(च) "मुख्यमंत्री शौर्य पदकाची" घोषणा **महाराष्ट्र दिन १ मे रोजीच्या पूर्वसंध्येला** करण्यात येईल.

(छ) प्रत्येक वर्षाचे प्रस्ताव ग्राहय धरण्याकरीता पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची **एका वर्षाची** कामगिरी गृहित धरली जाईल.

(ज) सदरचा पूरस्कार प्रदान करण्यासाठी दि. १ जानेवारी २०२६ पासून पुढे पात्रता तपासण्यात यावी.

(झ) ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना मुख्यमंत्री शौर्य पदक प्राप्त झाली आहेत, त्यांची नावे **महाराष्ट्र राज्याच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील**.

५. **"मुख्यमंत्री शौर्य पदकाचे" स्वरुप :-**

(क) मुख्य पदक हे ताब्यांचे (Copper) असेल व त्याचा आकार गोल असेल. पदकाचा व्यास ३५ मिली मीटर व जाडी ३ मिली मीटर असेल.

(ख) पदकाला लावण्यात येणारी रिबीनची रुंदी ३० मिली मीटर, लांबी ८० मिली मीटर व जाडी २ मिली मीटर इतकी असेल. रिबीनवर पिवळा, लाल व निळा असे तीन रंग असतील. त्यामध्ये डावीकडून पिवळा रंग १३ मिली मीटर, मध्यभागी लाल रंग ४ मिली मीटर व उजवीकडे निळा रंग १३ मिली मीटर इतका असेल.

(ग) पदकाच्या पुढील बाजूवर महाराष्ट्र शासनाचा मराठीतील लोगो असेल व त्याचे वरील बाजूस **"महाराष्ट्र शासन"** व खालील बाजुस **"मुख्यमंत्री शौर्य पदक"** असे लिहिलेले असेल, तसेच मागील बाजूवर महाराष्ट्र पोलीस दलाचा लोगो असेल व त्याचे खालील बाजूस **"वीरता परमधर्मः"** असे लिहिलेले असेल.

६. **आर्थिक बाब:-**

(क) प्रत्येक पदकाचा व प्रशस्तिपत्राचा अपेक्षित खर्च रु.६००/- आणि रोख रक्कम रु.५०,०००/- असे एकूण रु.५०,६००/- इतका आहे. मुख्यमंत्री शौर्य पदकांची संख्या निश्चित नाही. सदर अपेक्षित खर्च हा मागणी क्र." क्र. बी-१, २०५५ पोलीस (००), जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल (२०५५ ०१६८) ०५-वक्षिसे " या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६१०१६१७१६५२४९२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MANISHA PATANKAR MHAISKAR

Digitally signed by MANISHA PATANKAR MHAISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=FEF2886076676DBEBEE07D0F1AF7414B764EA7E53ECAA48A423E4054CA267CA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=52783A272FC45F858A9EFA9D9E02BE6EF3188F66348E265A2D1F209EE93B9F6C, cn=MANISHA PATANKAR MHAISKAR
Date: 2026.10.16 17:19:47 +05'30'

(मनीषा पाटणकर - म्हैसकर)
अपर मुख्य सचिव, गृह विभाग

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (गृह / शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव यांचे सचिव मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१०) पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११) महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.
१३) महासमादेशक, गृहरक्षक दल व संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
१५) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१६) सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
१७) सर्व अपर पोलीस महासंचालक.
१८) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
१९) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२१) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
२२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२३) वित्त विभाग (व्यय ७/अर्थसंकल्प-२), मंत्रालय, मुंबई.
२४) उप सचिव, रोख शाखा, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय मुंबई.
२५) सहायक संचालक, भापोसे कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) गृह विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२७) निवड नस्ती-पोल-१.